संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# हल्ल्यामागे आणि हल्ल्यानंतरचे कोण?

पुलवामा हल्ल्याचा काळ जसजसा जाऊ लागला आहे. तसतसे नवे वळणही मिळू लागले आहे. याचे आता राजकीय लाभ उठवण्याचे प्रयत्नही जोरात सुरु झालेले दिसतात. तर आंतरराष्ट्रीय स्तरावर अमेरिकेसारखा देश भारताच्या पाठीशी आहे की नाही. हेदेखील स्पष्ट होताना दिसते. भारतात हल्ल्याची घटना होऊन आठ दिवसाचा कालावधी गेला असताना देशाचे राजकीय पक्षही या हल्ल्याचे राजकारण करताना दिसतात. पहिले दोन तीन दिवस सर्वांनीच आपण सरकारच्या पाठीशी आहोत अशा प्रकारची भूमिका घेतली होती. आता मात्र या हल्ल्याला सरकार कसे जबाबदार आहे. अशी थेट विधाने होऊ लागलेली दिसतात. तर आंतरराष्ट्रीय स्तरावर दहशतवादाच्या विरोधात अमेरिका खुलेपणाने आपले समर्थन करील असे वाटले होते. परंतु एकंदरीतच तसे घडू शकलेले नाही. ट्रंप यांनी पहिल्यांदाच पुलवामा हल्ल्याबाबत जाहीर वक्तव्य केलेले दिसते. भारताची पाकविरोधात जोरदार तयारी सुरु आहे असे सूचक विधान करून अमेरिकेची भूमिका नेमकी काय असेल हे गुलदस्त्यात ठेवलेले दिसते. उलट दोन्ही देशातील परिस्थिती तणावपूर्ण आहे हे सांगताना अमेरिका दहशतवादाविरोधात भारताच्या पूर्ण पाठीशी राहील इतकी स्पष्टता त्यांनी केलेली नाही. हल्ल्यामागे पाकिस्तान आहे. हे सगळ्या जगाने मान्य केले. परंतु हा लढा जितका पाकिस्तानविरुध्द भारत आहे त्यापेक्षाही दहशतवादविरुध्द संपूर्ण जग अशी त्याची व्याप्ती आहे. भारतानेदेखील पुलवामा हल्ल्याचे वर्णन हे दहशतवादी संकट अशा शब्दात केले होते आणि या संकटाचा पाठीराखा पाकिस्तान असल्याने जगातल्या सर्व देशांनी पाकविरुध्द भूमिका घ्यावी असेही आवाहन केले होते. परंतु जवळपास सर्वच देशांनी हल्ल्याचा निषेध केला. आणि भारत स्वतःचे संरक्षण करण्याकरीता स्वतंत्र आहे. असे मत अनेकांनी मांडले म्हणून यामधून एकत्रितपणे अनेक देशांनी दहशतवादविरोधात आवाज उठवलेला दिसत नाही. यापूर्वी जगातल्या अनेक देशांमध्ये हल्ले झाले. त्यावेळी भारताने स्पष्ट शब्दात आपली दहशवादविरोधी भूमिका व्यक्त केली होती. आणि संबंधित देश जे काही भूमिका घेतील. त्यात भारत सहभागी असेल अशी ग्वाहीही दिली होती.

**ट्रंप यांची अनिश्चित भूमिका**

आज मात्र दहशतवादविरोधी आंतरराष्ट्रीय लढ्याबाबत अनेक देशांचा संघटित आवाज उमटताना दिसत नाही. याची भारताने दखल घेतली पाहिजे. आणि पाकविरुध्द लढताना आंतरराष्ट्रीय समुदाय कशा प्रकारे आपल्या सोबत आहे याची स्पष्टता करून घेतली पाहिजे. आंतरराष्ट्रीय स्तरावर ही परिस्थिती असताना निदान राजकीय पक्षांनी या हल्ल्याचे राजकारण करू नये. किंवा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून कोणीही त्याचा राजकीय फायदा उठवू नये. अगदी सत्ताधारी पक्षसुध्दा हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आपली राजकीय पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करेल तर तसे करण्याची संधी सत्ताधारी पक्षाला मिळू नये. असे प्रयत्न विरोधी पक्ष करतील. त्याची सुरुवातही झाली आहे. आणि ओवेसीसारख्या नेत्याने पुलवामा हल्ल्यातील हुतात्मे हे राजकीय बळी असल्याचा बेछूट आरोप केला आहे. काँग्रेसनेदेखील हल्ल्याच्यावेळी मोदी काय करत होते इथपासून ते केंद्रीय राखीव दलाची त्यावेळी विमानाने जाण्याची मागणी सरकारने मान्य केली नाही इथपर्यंत टीका केलेली आहे. इतरही राजकीय पक्ष आता दबलेल्या आवाजात टीका करू लागले आहेत. एकीकडे पाकिस्तानने हल्ल्या संदर्भात कोणतीही माघार घेतलेली नाही किंवा तिथल्या दहशतवाद्यांविरुध्द ठोस कारवाईही केलेली नाही. अशावेळी पुलवामा हल्ला आणि त्याचे संभाव्य पैलू हेदेखील समोर येऊ लागले आहेत. ही वेळ राजकारण करण्याची नाही पण जर का याबाबत निश्चित भूमिका घेतल्या जात नसतील तर हल्ल्यामागे कोण आणि हल्ल्यानंतर कोण असा तितकाच महत्वाचा प्रश्न उपस्थित होतो. सगळ्या जगाने हल्ल्यामागे पाकिस्तान असल्याचे मान्य केले आहेच पण हल्ल्यानंतर त्याबाबतही शंका घेतल्या जात असतील तर मात्र त्यानंतरची विधाने याचाही थेट परिणाम समाजमनावर आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही पाहायला मिळू शकतो. अमेरिकेसारख्या देशाचा प्रमुख डोनाल्ड ट्रंप भारत आणि पाकिस्तानमधील परिस्थिती गंभीर असल्याचे विधान करतो. याचा अर्थ भारताने चालवलेल्या तयारीची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेतलेली आहे आणि त्याच्या परिणामांचीही चर्चा सुरु झालेली दिसून येते. म्हणूनच हल्ल्यामागची कारणे आणि हल्ल्यानंतरचे उपाय या दोन्ही गोष्टींसाठी खूप सावधानता बाळगली पाहिजे.

**शत्रूपक्षाला संधी नको**

ट्रंप यांच्या पाकिस्तानविरुध्दचा लढा भारताला जवळपास एकट्याने लढावा लागेल असे चित्र दिसून येते म्हणजेच सर्व शक्तीनिशी पुलवामा हल्ल्याचा प्रतिकार करायचा असेल तर भारतातल्या सर्वांचा एकत्रित आवाज कायम राहाणे तितकेच महत्वाचे ठरते. कदाचित निवडणुकांची धामधुम ही गोष्टदेखील शत्रूपक्षाला राजकीय अस्थिरता माजवण्याची संधी वाटू शकते. आणि या राजकीय अस्थिरतेचा गैरफायदा घेतला जाऊ शकतो. अनेक पध्दतीने या हल्ल्याचा गैरअर्थ काढण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्याप्रमाणे ट्रंप यांनी भारताला खुले समर्थन दिलेले नाही. किंवा दहशतवाद ही आंतरराष्ट्रीय समस्या असूनही त्या दहशतवादविरोधी लढ्यात आम्ही भारताबरोबर आहोत अशी निसंदिग्ध ग्वाहीदेखील त्यांनी दिलेली नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावरचे परराष्ट्रीय राजकारण हे वेगळ्या स्तरावरचे असते. तिथेही प्रत्येक राष्ट्र आपापला स्वार्थ साधून घेऊ शकतो. अशावेळी निदान भारतातल्या प्रत्येकाने मग तो राजकीय पक्ष असो सामाजिक संघटना असो. विविध विषयांचा अभ्यास असो. सर्वांनीच पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद हा जगासाठी किती धोक्याचा आहे. हेच मांडले पाहिजे आणि भारताने सुरु केलेल्या मोहीमेला जगाने कसा पाठिंबा द्यावा असाही आग्रह धरला पाहिजे. परंतु आपल्याच देशातील लोक या हल्ल्याचा गैरअर्थ काढायला लागले तर त्या परिस्थितीचा गैरफायदा शत्रूपक्ष निश्चितच घेईल.